महाराष्ट्र शासन
(सामान्य प्रशासन विभाग)
**मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी**
**नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर**
(विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर विभाग)
मदता प्रशिक्षणातून परिवर्तन
www.madta.org.in | prabhodini31paithan@gmail.com | ☎ 02431350605

**दरपत्रक क्र.०2/२०२६** **दिनांक :- 06/04/2026**

## दरपत्रक सूचना

मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ही संस्था सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिनस्त स्वायत्त प्रशिक्षण संस्था असून छत्रपती संभाजीनगर विभागाची विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था आहे. या संस्थेत शासन सेवेतील गट ब आणि गट क संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांना निवासी प्रशासकीय प्रशिक्षण दिले जाते. संस्थेच्या प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान प्रशिक्षणार्थीकरिता क्षेत्रभेट / अभ्यास दौरा आयोजित करण्यात येतो. सदर क्षेत्रभेट / अभ्यास दौऱ्याकरिता संस्थेच्या आवश्यकतेप्रमाणे वाहन पुरविण्याकरिता इच्छुक सेवापुरवठाधारकाकडून खालील अटी व शर्तींस अधीन राहून स्पर्धात्मक पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**२) दरपत्रक तपशील**

| अ.क्र | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | कामाचे स्वरुप | प्रशिक्षणार्थी क्षेत्रभेट / अभ्यास दौरासाठी वाहन सेवा पुरविणे |
| २ | करार कालावधी | १ वर्ष |
| ३ | दरपत्रक दाखल करण्याचा कालावधी | दि.०६/०४/२०२६ ते १५/०४/२०२६ कार्यालयीन वेळेमध्ये<br>**अ) सूचना**<br>१. दरपत्रक सीलबंद असणे आवश्यक राहील.<br>२. एकावेळी एकच दरपत्रक सादर करता येईल.<br>३. दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात विहीत मुदतीत प्रशिक्षण संस्थेत सादर करावे.<br>४. विहीत मूदतीनंतर प्राप्त दरपत्रक लिफाफायाचा विचार केला जाणार नाही.<br>५. दरपत्रकधारकास सेवेच्या संबंधीच्या शंका निवारणासाठी व मार्गदर्शनासाठी संस्थेस कार्यालयीन वेळेत भेट देता येईल.<br>**ब) दरपत्रक पाठविणेकरिता कार्यालयाचा पत्ता**<br>मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ४३११४८ |
| ४ | दरपत्रक लिफाफा उघडण्याचा दिनांक | दि.१६/०४/२०२६ दुपारी १२.०० वाजता<br>(सहभागी सेवापुरवठादार उपस्थित असो किंवा नसो).<br>स्थळ :- प्रशासकीय इमारत, मप्रविप्रप्र, पैठण |

Scanned with OKEN Scanner

३) दरपत्रक सादर करण्याची पध्दत BOQ (Bill of Quantity) :-

| Sr. No | Description (A) | Qty | Rate By Service Provider (Rs) (Rate without GST) (B) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थानिक वाहतुक | | | बाहेरगावी वाहतुक | |
| | | | ५ तास ४० कि.मी दर (रु) | पुढील जादा प्रति कि.मी दर (रु) | प्रतिक्षा दर प्रति तास (रु) | प्रति दिवशी किमान वापर व दर प्रति ३०० कि.मी (रु) | पुढील जादा प्रति कि.मी दर (रु) |
| 1 | १७ Seater Bus AC | 1 | | | | | |
| 2 | ३२ Seater Bus AC | 1 | | | | | |
| 3 | २५/२७ Seater Bus AC | 1 | | | | | |
| 4 | ४५ Seater Bus AC | 1 | | | | | |
| | | | | | | | |
| | | Total | | | | | |

:: सूचना ::

१. **सेवापुरवठादाराने सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे -**
   १. आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र / शॉप ॲक्ट
   २. आधारकार्ड / पॅनकार्ड
   ३. GST नोंदणी प्रमाणपत्र
   ४. वाहनाचे / चालकाचे सर्व कागदपत्रे जसे - नोंदणी, कर, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परवाना, पीयुसी, चालकाची अनुज्ञप्ती, बॅच इत्यादी वैध असणे आवश्यक आहे.

२. स्तंभ (B) मध्ये नमूद करण्यात येणारे दर GST वगळून सादर करावे.

३. स्तंभ (B) मध्ये नमुद केलेले दराव्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम सेवापुरवठाधारकांस देय असणार नाही.

४. उपरोक्त दर नमूद करतांना निविदेतील सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचूनच दर सादर करावेत.

४) **सेवेच्या अटी व शर्ती** :-

१. पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत सेवा देणे बंधनकारक राहील.
२. सदर कामासाठी कोणत्याही स्वरुपात संस्थेमार्फत अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.
३. वाहने स्वच्छ, सुरक्षित व प्रवास योग्य असणे आवश्यक आहे.
४. दरपत्रकामध्ये नमूद केलेली सेवा उच्च दर्जाची पुरविणे आवश्यक राहील.
५. टोल, पार्किंग किंवा परमिट यांच्या पावत्या देयकासोबत जोडल्यास त्याचे वेगळे पैसे संस्थेमार्फत देण्यात येतील परंतु वाहनचालक भत्ता व इंधन व देखभाल खर्च संस्थेमार्फत देण्यात येणार नाही तसेच कोणतीही आगाऊ रक्कम देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
६. क्षेत्रभेटी दरम्यान वाहने नादुरुस्त झाल्यास वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित सेवापुरवठाधारकाची राहील.
७. अपघात झाल्यास सर्व कायदेशीर जबाबदारी सेवा पुरवठाधारकाची राहील.
८. सेवेसंबंधी तक्रार आल्यास देयकातून दंडात्मक कार्यवाही म्हणून १०% रक्कम कपात करण्यात येईल.
९. या कार्यालयाकडून सूचना मिळल्यानंतर तत्परतेने सेवा देणे बंधनकारक राहील. यामध्ये बेजबाबदारपणा आढळून आल्यास त्याच दिनांकास दरपत्रक करार संपूष्टात आणण्यात येईल.
१०. आवश्यकतेनुसार शासकीय सूट्टीच्या दिवशी देखील सेवा देणे बंधनकारक राहील.

५) **निवड प्रक्रिया** :-

१. या कार्यालयामार्फत गठीत करण्यात येणाऱ्या समितीमार्फत दरपत्रकधारकाने सादर केलेल्या आवश्यक कागदपत्रांची तपासणी करुन पात्रता ठरविण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

२. **निविदा न्युनतम दर ठरविण्यासाठी BOQ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे स्तंभ (B) मधील १ ते ४ बाबींसाठी येणाऱ्या एकुण दरांची तुलनात्मक पडताळणी करुन न्युनतम दर (L१) निश्चिती करण्यात येईल.**

३. दरप्रक्रिया प्रक्रिया राबवितांना सहभागी L१ पुरवठाधारकाचे एकसमान दर आल्यास सदर प्रकरणी वाटाघाटी करुन निविदा अंतिम करण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे.

४. दरपत्रकधारकांना काही तक्रार असल्यास मा. संचालक, मप्रविप्रप्र, पैठण यांचेकडे तक्रार करता येईल. मात्र या प्रकरणी मा. संचालक, मप्रविप्रप्र, पैठण यांचा निर्णय अंतिम असेल.

**सदर निवड प्रक्रिया कोणत्याही वेळी/ कोणत्याही कारणास्तव/ कोणत्याही टप्प्यावर/ पुर्णत: किंवा अशंत: रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचा अधिकार या संस्थेने राखून ठेवला आहे.**

**(डॉ. नरेश संगम)**
निबंधक
मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाथनगर (उ), पैठण जि. छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner